REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 11 | AUGUST - 2022

# रायगड जिल्ह्यातील आदिवासी समाजाचा बदलत्ता दर्जा

डॉ. नाथिराम लक्ष्मण राठोड

## सारांश




भारतीय समाजातील आर्थिक स्थितीचा विविध अंगानी अभ्यास झाला पाहिजे. कारण आपल्या देशातील समाजात धर्म, वंश जाती, भाषा व तद्वतच विविध वैशिष्टयपूर्ण असे सामाजिक समूह आहेत. त्यातील काही समुह बहुसंख्या आहेत तर काही प्रादेशिक भाषा बोलणारे आहेत. या सर्व सामाजिक घटकांचा त्यांच्या विकासासाठी अनेक सोयी, सुविधा उपलब्ध करुन देणे हे राष्ट्रीय कर्तव्य आहे. कारण या सर्व घटकाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी आर्थिक स्थिती महत्वाची आहे. भारत हा अतिप्राचीन संस्कृती व परंपरा लाभलेला देश आहे. या देशातील समाजाची जडणघडण ही अनेक स्थित्यंतरामधून होत गेलेली आहे. या देशावर अनेक परकीय आक्रमणे झाली या आक्रमणांचा भारतीय समाजाच्या जडणघडणीवर विविधांगी परिणाम झालेला आहे. परकीयाच्या आगमनातून परकीय संस्कृतीही इथे रुजल्या आहे. या अनेक संस्कृती आजही टिकून आहेत. तद्वतच सामाजिक गतीमानतेच्या प्रवाहात काही संस्कृतीचे स्वरुप बदलले आहे. आणि या उलथापालथीमधून भारतीय समाज हा एक वैशिष्टयपूर्ण अशा अनेक गुणाचा प्रांत आहे. प्रत्येक प्रांताची भाषिक संस्कृती वांशिक व तत्सम गुणधर्माच्या संदर्भात वैविध्यपूर्ण अशी एक विशिष्टता आहे. या विविध प्रांतामधील सामाजिक घटक ही वैशिष्टयपूर्ण आहेत.प्रशासकीयदृष्ट्या सोयीचे व्हावे म्हणून १८६९ मध्ये एक स्वतंत्र जिल्हा म्हणुन कुलाबा जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली.

## प्रस्तावना :

रायगड जिल्हा हा प्रामुख्याने आदिवासीबहुल जिल्हा म्हणून ओळखला जातो. रायगड जिल्हयाचा आर्थिक विकास हा मुख्यत: आदिवासी समाजाच्या आर्थिक विकासावर अवलंबून आहे. त्यामुळेच या समाजाच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास हा पायभूत ठरतो. आदिवासी समाजातील अर्थार्जनाच्या पारंपरिक पध्दती, साधने व त्यांचे उत्पन्न यांच्या अभ्यासाबरोबर या समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी शासन, निमशासन स्तरावर राबविल्या जाणाऱ्या योजना व त्या योजनांच्या संप्रेषणाची परिणामकारकता तपासणे हा प्रस्तुत अभ्यासाचा हेतू आहे. स्वयंसेवी वा अशासकीय संस्थांच्या (NGO's) योजनांची संप्रेषणपध्दत व परिणामकारकता यांचाही अभ्यास प्रस्तूत संशोधनात समाविष्ट असेल. त्यासाठी या आदिवासी जमातीच्या आर्थिक स्थितीची संप्रेषणात्मक दृष्टीकोनातून एक विश्लेषणात्मक अभ्यास करण्याचा प्रयत्न या संशोधनाद्वारे करण्याचा मानस आहे. भारतीय संविधानानुसार त्यांची सूची केलेली आहे. त्यामुळे या समुहाला 'अनुसूचित जमाती' असेही म्हणतात. सध्या या जिल्हयात ३९ अनुसूचित जमातींचे लोक वास्तव्य करुन आहेत. त्यामध्ये लोकसंख्येनुसार कातकरी, महादेव कोळी, डोंगरकोळी व ठाकूर या प्रमुख जमातीचा समावेश होतो. १९८१ च्या आकडेवारीनुसार एकूण १४.८६ लाख लोकसंख्येमध्ये

१.९० लाख इतकी अनुसूचित जमातीची लोकसंख्या होती. लोकसंख्येचे हे प्रमाण निश्चित लक्षणीय आहे. या आदिवासी समाजातील त्यांची कुटुंबव्यवस्था, रुढी, परंपरा यातही भिन्नता आढळते. शिवाजी महाराजांच्या राजधानीच्या स्मृतीप्रित्यर्थ १ मे, १९८१ पासून या जिल्ह्याचे कुलाबा हे नाव बदलले गेले व त्याचे 'रायगड' असे नामकरण करण्यात आले. रायगड जिल्हा अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर पसरलेला आहे. एकूण ७१४७ चौ.किमी क्षेत्रफळ असलेल्या या जिल्ह्याचे महाराष्ट्राच्या एकूण क्षेत्रफळाच्या २.३२% इतके आकारमान व्यापलेले आहे. विविधतेने या जिल्हयात आदिवासीमध्ये भिन्न भिन्न जाती आहेत

## व्याख्या :

१) **गिलीन यांच्यामते :** एका विशिष्ट भूप्रदेशात राहणाऱ्या, समान बोलीभाषा बोलणाऱ्या व समान सांस्कृतिक जीवन जगणाऱ्या पण अक्षरओळक्ष नसलेल्या स्थानिक गटाच्या समुच्चयाला आदिवासी समाज म्हणतात.

२) **डॉ.रिव्हर्स :** या समूहातील सदस्य एक समान बोलीभाषा बोलतात, युध्द वगैरे सारख्या उद्दिष्टपूर्तीकरिता एक होउन झटतात अशा सरळ व साध्या सामाजिक समूहाला आदिवासी समाज असे म्हणतात.

३) **आदिवासी समितीच्या परिषदेने केलेली व्याख्या :** एक समाज भाषेचा वापर करणाऱ्या एकाच पूर्वजापासून उत्पत्ती सांगणाऱ्या, एका भूप्रदेशात वास्तव्य करणारा भारतीय तंत्रज्ञानाच्या दृष्टीने मागासलेल्या, अक्षर ओळख नसलेल्या व रक्तसंबंधावर आधारित सामाजिक व राजकीय रितीरिवाजाचे प्रामाणिकपणे पालन करणाऱ्या एकजिनसी गटाला आदिवासी समाज म्हणतात.

## संशोधनाची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :

१) रायगड जिल्ह्यातील आदिवासीच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
२) रायगड जिल्ह्यातील आदिवासींच्या आर्थिक विकासासाठी राबविण्यांत येणाऱ्या शासकीय योजनांचा अभ्यास करणे.
३) शासकीय योजनांची अंमलबजावणी कशाप्रकारे होत आहे याचा अभ्यास व मूल्यमापन करणे.
४) रायगड जिल्ह्यातील आदिवासीच्या आर्थिक विकासासाठी राबविण्यांत येणाऱ्या शासकीय योजना परिणामकारक कशा राबविता येतील यावर उपाययोजना सुचविणे.
५) रायगड जिल्ह्यातील आदिवासींच्या आर्थिक विकासासाठी सुयोग्य असे प्रारुप तयार करणे.

## संशोधन पध्दती :

या संशोधन कार्यात प्रामुख्याने आर्थिक स्थितीचा अभ्यास केला जाणार असल्यामुळे प्रस्तुत संशोधनासाठी वेगवेगळ्या मार्गांनी आवश्यक ती तथ्ये संकलित करण्यासाठी तथ्य संकलणाच्या पुढील मार्गाचा वापर केला जाईल.

**अ) प्राथमिक मार्ग (Primary Source) :** या मार्गाने तथ्ये संकलित करण्यासाठी प्रथमतः आवश्यक त्या आकाराचा व आदिवासींच्या सर्व घटकाचे न्याय प्रतिनिधीत्व करणारा नमुना हा योग्य नमुना निवड तंत्राचा वापर करुन निवडला जाईल. तसेच रचनाबध्द / सरंचित प्रश्नावलीच्या आधारे नमुना निवड पध्दतीने निवडलेल्या लोकांच्या मुलाखती घेतल्या जातील.

**ब) दुय्यम मार्ग (Secondary Source) :**

तथ्य संकलनाच्या दुय्यम स्त्रोतामध्ये लोकसंख्या व अन्य आर्थिक व सामाजिक बाबीविषयी विविध संदर्भ पुस्तके, प्रकाशित अहवाल, आदिवासी विकासासंबंधी प्रकाशित झालेल्या विविध माहिती पुस्तिका, संशोधन विषयासंदर्भात प्रकाशित झालेले विविध अभ्यासकांचे लेख इ. चे परिशीलन करुन सांख्यिकीय व अन्य संकलित करुन त्यांचे विश्लेषन संख्या शास्त्रीय पध्दतीचा वापर करुन केले जाईल.

**माहिती संशोधित मिळविण्याची साधने :**

प्रश्नावली तयार करणे व मुलाखत तंत्र - गहीतकृत्ये पडताळून पाहण्यासाठी संशोधनाची उद्‌दिष्टे साध्य करण्यासाठी व त्यातून तथ्यसंकलन करण्यासाठी प्रश्नावाली व मुलाखतीद्वारे संशोधन समस्येवरील माहिती अभ्यासक मिळविले.

आदिवासी कुटुंबे योजनाचे लाभार्थी काही सरपंच, उपसरपंच, काही शासकिय अधिकारी, स्वयंसेवी संस्थेचे प्रकल्प अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, पालकमंत्री, आदिवासी मंत्रालयातील काही अधिकारी यांच्या मुलाखती प्रश्नावलीद्वारे घेतल्या जातील.

**नमुनानिवड -** लाभार्थींच्या अभ्यास करण्यासाठी प्रतिनिधीक नमुना निवड पध्दतीचा वापर केला जाईल. यापध्दतीला या दृच्छिक पध्दती असेही म्हटले जाते. २ लाख लोकसंख्येच्या नमुन्याची टक्केवारी एक प्रतिकृती म्हणून वापरता येईल. या पध्दतीत संभाव्यता नमूना हा प्रतिनिधीक स्वरुपाचा नमुनानिवड पध्दतीत योग्य ठरते.

**शैक्षणिक स्थिती :**

रायगड हा कोकणातील एक प्रमुख जिल्हा तसेच मुंबई शहराला जवळ असणारा जिल्हा आहे. जिल्ह्यामध्ये प्राथमिक, माध्यमिक शिक्षण, उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी आहे. याचे मुख्य कारण म्हणजे १०वी किंवा १२वी नंतर ही मुले रोजगारासाठी मुंबई किंवा इतर शहरांकडे जात असल्याने त्यांचे शिक्षणाकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे त्याचा विपरीत परिणाम त्यांच्या कौटुंबिक विकासावर होतो. रायगड जिल्ह्यातील विविध शैक्षणिक संस्थांची माहिती तक्ता क्र. २.८ मध्ये दर्शविली आहे.

**उद्योगधंदे व व्यवसाय :**

रायगड जिल्ह्यामध्ये उद्योगधंद्याचा अलीकडील काळात चांगला विकास झाला आहे. रायगड जिल्ह्यातील खोपोली (१०.९ हेक्टर), पनवेल (१२.३१ हेक्टर), कामोठे (२३.८ हेक्टर) रोहा (२००.४४ हेक्टर) तळोजा (८९३.३१ हेक्टर), पाताळगंगा (३१३.७० हेक्टर), बिरवाडी, ता. महाड (४७०.३९ हेक्टर) इ. ठिकाणी औद्योगिक वसाहती स्थापन करण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर नागोठणे, माणगाव, अलिबाग इत्यादी ठिकाणी मोठे मोठे कारखाने उभे राहिले आहेत. रायगड जिल्ह्यातील २००५ या वर्षात १२४३ नोंदणीकृत कारखान्यांपैकी ११० कारखाने बंद असून ११३३ इतक्या चालू कारखान्यांमध्ये ७११६९ इतक्या कामगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

औद्योगिक उत्पादनापैकी रसायने, रंग, कागद, औषधे, लोखंडी साहित्य, रासायनिक खते विविध प्रकारची पेय इत्यादींचे उत्पादन रायगड जिल्हयात होते. त्याचबरोबर रोहा, महाड, पाली येथील तांब्या पितळीची भांडी प्रसिध्द आहेत तर रोहयामध्ये पोहे, महाड, पाली, खालापूरची मातीची भांडी, विटा आणि पेण गणपती उद्योग आजही अनेकांना रोजगार उपलब्ध करुन देतो. तसेच अनेक ठिकाणी मिठागरांचे व्यवसाय चालविले जातात.

**१. संशोधनाचा विषय :**

'रायगड जिल्ह्यातील आदिवासींच्या आर्थिक विकासाच्या शासकीय योजनांचा चिकित्सक अभ्यास'.

**महत्त्व :**

रायगड जिल्हयात आदिवासीमध्ये भिन्न भिन्न जाती आहेत आणि लोकसंख्येचे प्रमाणे निश्चित लक्षणीय आहे. या जिल्ह्याचा आर्थिक विकास हा मुख्यत: आदिवासी समाजाच्या आर्थिक विकासावर अवलंबून आहे. त्यामुळेच या समाजाच्या

आर्थिक विकासाचा अभ्यास हा पायाभूत ठरतो; म्हणून या आदिवासी जमातीच्या आर्थिक विकासाच्या शासकीय योजनांचा चिकित्सक व मूल्यमापनात्मक अभ्यास करण्याचा प्रयत्न या संशोधनाद्वारे करण्याचा मानस आहे.

**जंगल क्षेत्र :**

सन २००१ च्या जणगणनेनुसार रायगड जिल्हयातील जंगलव्याप्त क्षेत्र एकूण भौगोलिक क्षेत्रफळाच्या २१.६४% इतके आहे. प्रशासनाच्या सोयीसाठी जिल्हयात दोन विभाग करण्यात आले आहेत. त्यामध्ये रोहा आणि अलिबाग यांचा समावेश होतो. रोहा वनविभागात रोहा, माणगाव, तळा, महाड, पोलादपूर, मुरुड, म्हसळा तर श्रीवर्धन वनविभागात कर्जत, खालापूर, पनवेल, उरण सुधागड(पाली) आणि अलिबाग या तालुक्यांचा समावेश होतो. या वनांमध्ये साधारणपणे साग, आंबा, आपटा, आसना, अशोक, बाभूळ, बेहडा, बोंडारा, चंदन, घावडा, गोरखचिंच, पळस, खेर, कुंभी, बांबू, काजे इ. वनस्पतींच्या जाती आढळून येतात. या वृक्षापासून मिळणारे लाकुड प्रामुख्याने सरपण फर्निचर व घरबांधणीसाठी वापरले जाते. या वनांमध्ये वाघ, कोल्हे, रानडुक्कर, ससे, सांबर, रानमांजर, तरस, भेकर, नीलगाय, माकड इ. वन्य प्राणी आढळतात. रायगड जिल्हयातील पनवेल तालुक्यात कर्नाळा येथे ऑक्टो. १९६९ पासून पक्षी अभयारण्य स्थापन करण्यात आले आहे.या दोन्ही अभयारण्यात विविध प्रकारचे असंख्य पक्षी आढळतात.

जिल्ह्यात २००१ मध्ये जंगलांचे एकूण क्षेत्र १४८६९४ हेक्टर होते. त्यापेकी ८०% जंगल राखीव ११% संरक्षित आणि ९% अवर्गीकृत होते. सुमारे ९५% जंगल वनविभागाच्या अखत्यारीत होते. तर उर्वरित महसूल विभागाच्या ताब्यात होते. रायगड जिल्ह्यातील आदिवासी समाजातील कातकरी, महादेव कोळी आणि ठाकर या आदिवासी जमाती आजही आंबा, काजुबिया, करवंद, जांभुळ, बोर, राजणा इ. वन्यपदार्थ व फाटी गोळा करुन विकतात व त्यावर आपली उपजिविका करतात. मात्र अलिकडील काळात मोठया प्रमाणावर होणारी जंगलतोड आणि उन्हाळयामध्ये जंगलाना लावल्या जाणाऱ्या आगी तसेच वाढते शहरीकरण आणि औद्योगिकरणामुळे शेकडो वर्षांपूवीची ही वनसंपदा झपाट्याने संपुष्टात येत आहे. ती टिकविण्यासाठी शासन, स्वयंसेवी संस्था व जनता यांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**लोकसंख्या :**

मानवी संसाधन राज्याच्या किंवा विशिष्ट भागाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीकोनातून महत्वाचे स्थान असते. मानवी संसाधन किंवा मानवी साधन सामुग्री म्हणजेच लोकसंख्या होय. या उपलब्ध लोकसंख्येमधूनच श्रम व संयोजक हे उत्पादनाचे दोन प्रमुख घटक मिळतात. या घटकावरच विकासाचा दर अवलंबून असतो. सन १९९१च्या जनगणनेनुसार रायगड जिल्ह्याची एकूण लोकसंख्या १८२४८१६ इतकी होती.

**रायगड जिल्हयातील प्रमुख बंदरे, सेवाभावी संस्था आणि पर्यटन स्थळे:**

**अ) प्रमुख बंदरे :**

रायगड जिल्ह्याला जलवाहतुकीचा मोठा इतिहास आहे. इ.स. पूर्व ५०० ते २५० पर्यंत चौल, महाड, राजपूरी बंदरातून पर्शिया, ग्रीस, अरेबियाल येमेन, व इजिप्तबरोबर आयात निर्यात व्यापार सुरु होता. मात्र त्यातील बंदरे आज बंद आहेत. जिल्ह्यात पनवेल करंजा, मोरा, मांड्या, श्रीवर्धन, मुरुड, रेवदंडा, राजपुरी, रेवस, धरमनगर, थळ, अलिबाग, बोर्लीमांडला, उलवा, मांदाड यापैकी रेवस येथुन गेट-वे ऑफ इंडिया येथपर्यंत लॉच आणि कॅटेरोन सेवा सुरु आहे. करंजा मुंबई या जलमार्गावरदेखील वाहतुक सुरु आहे.

**ब) सेवाभावी संस्था :**

''जनसेवा हिच ईश्वर सेवा'' अशा भूमिकेतून लोककल्याणासाठी कार्य करणाऱ्या काही संस्था रायगड जिल्ह्यामध्ये आहेत. कठीण समयी हजारोंना आसरा देणाऱ्या रुग्णांची सेवा करणाऱ्या आणि सामान्यांची दु:खे जाणणाऱ्या काही संस्थाची ओळख करुन घेणे. संशोधकाला गरजेचे वाटते.

**ब १) युसुफ मेहेरअली सेंटर तारा :**

मुंबई-गोवा महामार्गावर पनवेल तालुक्यातील तारा गावी युसुफ मेहेरअली सेंटर ही संस्था १९६१ पासून कार्यरत आहे. स्वातंत्र्यलढ्यातील अग्रणी युसुफ मेहेरअली यांनी केलेल्या मानवतावादी कार्याचे स्मारक म्हणून ही संस्था कार्यरत आहे. गरीब, आदिवासी, आणि सर्वसामान्य घरातील लोकांना आरोग्यसेवा उपलब्ध करुन देण्याचे कार्य हे सेंटर करते. तारा येथे ३० खाटांचे रुग्णालयदेखील आहे. कुटुंबकल्याण शिबीर, नेत्र शिबीर, बालमाता संगोपन, प्रसूतिगृहाच्या सोयी उपलब्ध करुन दिल्या जातात. संस्थेने प्राथमिक शिक्षणासाठी आठ गावात शाळा बांधल्या असून खादी-ग्रामोद्योग मंडळाच्या सहकार्याने तेलघाणा, कृषी केंद्र सुतारकाम, लोकरीकाम, साबण उद्योग, दुग्धव्यवसाय यासारखे उद्योग सुरु करुन तरुणांना संस्थेच्या वतीने रोजगार उपलब्ध करुन दिला जातो. युसुफ मेहेरअली सेंटरने आदिवासींना घरे, वीज, पाणी, यांसारख्या सुविधाही उपलब्ध करुन दिल्या आहेत या सेंटरने आदिवासी समाजासाठी केलेल्या कार्याबद्दल १९८९-९० मध्ये महाराष्ट्र शासनाने ''आदिवासी सेवक'' पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे.

**ब २) शांतीवन मेरे :**

कुष्ठरोगी म्हणून समाजाने बहिष्कृत केलेल्यांना मायेचा हात देण्याचे काम मेरे येथील शांतीवन ही संस्था गेली ५० वर्षे करीत आहे. पनवेल तालुक्यातील मेरे येथे १२२ एकराच्या विस्तीर्ण भूमीवर कुष्ठरोग्यांना १ निराश्रितांना आधार देण्याचे काम चालते. आण्णासाहेब सहस्त्रबुध्दे आणि एस.एम जोशी यांच्या प्रेरणेने ही संस्था स्थापन झाली आहे. पिशव्या व सतरंज्या बनविणे, श्रमसंस्कार शिबिरे, आदिवासी आश्रमशाळा, निसर्ग विकास केंद्र, वृध्दाश्रम, ग्रामीण विकास प्रकल्प इ. प्रकल्प इथे चांगल्या प्रकारे राबविले जातात. पनवेल येथून पंधरा ते वीस मिनिटांच्या अंतरावर शांतीवन आहे.

**पर्यटन स्थळे :**

महाराष्ट्र अन्य जिल्ह्याच्या तुलनेत रायगड हा जिल्हा जर वेगळाच आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरु नये. रायगडात काय नाही? रायगडला इतिहास आहे. संस्कृती आहे, सुंदर निसर्ग आहे. नयनरम्य समुद्रकिनारा आहे, किल्ले आहेत, लेण्या आहेत, धबधबे आहेत. नागमोडी रस्ते आहेत, अष्टविनायकांपैकी दोन विनायक महडचा वरदविनायक व पालीचा बल्लाळेश्वर, 'महाराष्ट्राचा कॅलिफोर्निया' म्हणून या कोकणचा उल्लेख केला जातो.

**आदिवासी जीवन परिचय :**

भारताला स्वातंत्र्य मिळताना या प्रांतात तीन भारत होते. ब्रिटीश भारत, संस्थानिकांचा भारत आणि तिसरा आदिवासी भारत! याचाच अर्थ स्वातंत्र्यपूर्व कालखंडात विशेषत: ब्रिटीश काळात हे तीन भारत येथे आपले स्वतंत्र राजकीय, प्रशासकीय आणि सामाजिक अस्तित्व जपत आपापला राज्यकारभार करीत होते. त्यात आदिवासी भारत हा उर्वरित दोन भारतांना फारसा अपरिचित नव्हता कारण आदिवासी भारत केवळ राजकीयदृष्ट्या भिन्न होता असे नव्हे तर त्याची स्वतंत्र अशी संस्कृती होती. स्वतंत्र सांस्कृतिक ओळख असलेल्या या समाजाच्या सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थाही स्वतंत्र होत्या आणि म्हणून उर्वरित भारताला त्याची फारशी ओळख नव्हती. रेमंड आरिस्थन ब्रिजिट यांनी आदिम संस्कृतीचे संशोधन करुन नव्या पुराव्याने इतिहास लिहिला. त्यानुसार शिवालिक गिरीवनाच्या पायथ्याचा काळ २० लाख वर्षांपूर्वीचा ठरला आहे.

आदिवासींचा इतिहास मुळात त्यांनी आक्रमणाविरुद्ध केलेल्या प्रतिकाराचा इतिहास आहे. वसाहतवादाविरुद्ध प्रतिकाराची व संघर्षाची सुरुवात आदिवासींनी केली. इ.स. पूर्व १५००च्या सुमारास नागरी संस्कृती माहिती नसलेल्या भटक्या टोळ्यांचा भारतावर म्हणजे सिंधू संस्कृतीवर जो आघात झाला त्या आधीचे लोक ते आदिवासी. ऋग्वेद आणि सिंधू उत्खननाच्या अभ्यासकांच्या मते या हल्ल्यात किमान ६ लाख निरपराध नागरिक मारले गेले. इंद्र आर्यांचा नेता होता. या अगोदर आर्य लोक सिंधू लोकांची मुले व गाई पळवून नेत. ३०० वर्षे असेच चालले होतो. सिंधू लोक आर्यापेक्षा सुसंस्कृत होते. इ.स. पूर्व १२०० ते १५०० या काळीत स्रियांना पुढे करुन आर्यांनी गनिमीकावा केला, कारण चंड व मुंड या आदिजमातींनी आर्यांचा धुव्वा उडवून राज्ये ताब्यात घेतली होती. 'महिष' हा त्या काळातील भूषणभूत होता. निषाद, किरात, शबर, कावळ्याहून काळे, नरभक्षक, धरतीचे काळे पुत्र इत्यादी हिणकस नावांनी त्यांचा उल्लेख होत असल्याचे वेद, उपनिषदे व पुराणात आढळते.

**निष्कर्ष:**

भारतीय आदिवासींचे सामाजिक जीवन अतिशय वैशिष्ट्यपूर्ण असते. त्यांचे आंतरिक संबंध अनौपचारिक, परस्परपूरक आणि सहजीवन पद्धतीचे असतात. सह-संबंध हे त्यांच्या सामाजिक जीवनाचे ठळक वैशिष्ट्य असते. आदिवासी माणसाच्या वैयक्तिक किंवा कौटुंबिक जीवनात काही बरेवाईट प्रसंग आले तर ते संपूर्ण गाव आणि नातेवाईकांबरोबर वाटले जातात. घरात काही शुभकार्य असले तर ते आपलेच आहे, असे समजून कोणत्याही औपचारिक निमंत्रणाशिवाय ही मंडळी या कार्यात तन-मनाने गुंतून जातात. अशा प्रकारचे भावनिक पातळीवरचे त्यांचे हे सामाजिक जीवन असते. व्यक्तीकेंद्रित नव्हे तर समुदायाभिमूख असे हे जीवन शहरी किंवा ग्रामीण जीवनापेक्षा पूर्णपणे वेगळे परंतु तेवढेच स्वतंत्रवृत्ती जोपासणारे असते.प्रत्येक आदिवासी समुहाची सामाजिक वृत्ती ही स्वतंत्र असते. त्यात समानता आणि बंधुभाव ही वैशिष्ट्ये आहेत. पूर्वापार जोपासलेल्या या वैशिष्ट्यांमुळे या समुहाला एक विशिष्ट नाव मिळालेले असते आणि त्या नावानेच आपण त्या जमातीला ओळखतो. खरे तर या नावाची पूर्वपीठिका फार मजेशीर आणि महत्त्वाची असते. मध्य आणि पश्चिम भारतामध्ये भिल्ल आणि गोंड या जमातीच्या नावाचा पूर्वेतिहास फार उज्ज्वल आणि रंजक आहे. त्यांच्या सामाजिक जीवनात 'श्रेणीकरण' फारसे नसते, परंतु पश्चिम-उत्तर आणि मध्य हिमालयीन प्रांतातील आदिवासींमध्ये काही अंशी श्रेष्ठ-कनिष्ठता हे वैशिष्ट्य दिसून येते. मध्य आणि पश्चिम प्रांतातील काही जमातींमध्ये ही बाब आढळून येते. 'रक्तसंबंध' हे वैशिष्ट्य भारतीय आदिवासींमध्ये सर्वसाधारणपणे सगळ्याच समुहांमध्ये दिसून येते. याला अपवाद फक्त बिहारमधील 'मलेर' आणि 'पहरिया', हिमालयातील 'खासा', ओरिसातील 'सवर्णा' आणि दक्षिण भारतातील 'कदार', 'पंदरम', 'मलासर' आणि 'अलार' या जमातींचा आहे. या जमाती वगळता उर्वरित जमातींचे आपापसातील संबंध हे केवळ स्नेहाचे आणि भावनिक नव्हे तर आपल्या सगळ्यांचे पूर्वज हे एकच होते, पर्यायाने आपले संबंध हे वांशिक किंवा रक्ताचे आहेत, ही भावना त्यांच्यात असते.

बहुपतीत्वाची पद्धत भारतीय आदिवासींमध्ये नाही, परंतु हिमालयीन प्रांतातील विरळ लोकसंख्या आणि दुर्गम भौगोलिक वैशिष्ट्यामुळे तिकडील लडाख, जम्मू-काश्मीर, कांग्रा, चंबा, कुलू, मंडी या हिमाचलप्रदेशातील आणि उत्तरप्रदेश, अरुणाचल प्रदेशातील काही जमातींमध्ये बहुपतीत्वाची चाल आजही प्रचलित आहे. भारतात बहुपतीत्वाची पद्धत असलेल्या प्रमुख जमातीमध्ये मातृसत्ताक कुटुंबपद्धती अस्तित्वात होती, परंतु कालौघात सांस्कृतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये बाह्य पितृसत्ताक कुटुंबपद्धतीचा बहुतांश आदिवासी टोळ्यांनी स्वीकार केला .आदिवासीची मूळ संस्कृती आत्मवाद मानणारी, निसर्ग आणि पक्षी-पशूपूजक आहे. ही संस्कृती हाच त्यांचा धर्म असे सर्वसाधारणपणे मानले जाते आणि शास्त्रीय कसोटीवर ते सत्यही उतरलेले आहे. या मूळ आदिम संस्कृतीतून आजचे धर्म निर्माण झाले. त्याची सुरुवात वैदिक संस्कृतीपासून झालेली असावी. वेदांच्या रचनेला आधार ही येथील मूळ सिंधू संस्कृती आहे. सिंधू संस्कृतीमध्ये तत्कालीन आदिवासी जीवनाचे प्रतिबिंब आहे. या पार्श्वभूमीमुळेच भारतातील बहुसंख्य आदिवासी आणि हिंदू परस्परांच्या संपर्कात आले. हिंदूंना त्यांच्या चालीरीती, कर्मकांड सहजपणे आदिवासींपर्यंत पोहोचविता आली आणि म्हणून सद्यस्थितीतील भारतात आदिवासींच्या धार्मिक स्थितीकडे पाहिले तर असे दिसते की, ८९.३९% आदिवासींच्या मते त्यांचा धर्म हिंदू आहे. गेल्या काही दशकातील

जनगणना अहवालानुसार भारतातील आदिवासींमध्ये एकूण ५९ प्रकारच्या धर्माचे आचरण केले जाते. त्यात सर्वाधिक नोंद हिंदू आदिवासींची आहे, तर ५.५३% आदिवासी ख्रिश्चन आहेत, १ टक्क्यापेक्षा कमी बौद्ध असून जैन, शीख, मुस्लीम आणि झोरोस्ट्रीयन या सर्वांचे प्रमाण ४.१९% आहे, तर ४.१९% आदिवासींचे त्यांचे स्वत:चे असे ५२ प्रकारचे धर्म असल्याचे दिसून आले. त्यांपैकी निम्म्या म्हणजे २६ धर्मांची नावेही त्यांच्या जमातींचीच नावे आहेत. थोडक्यात आदिवासी धर्म मानणाऱ्या आदिवासींचे प्रमाणही लक्षणीय आहे, हे विशेष आहे.

**संदर्भ :**

१) आदिवासी जमातीचे ८०% पेक्षा जास्त प्रमाण - यामध्ये लक्षव्दीप, मिझोराम, नागालँड व मेघालय या राज्यांचा समावेश होतो. ईशान्य भारतातील जंगलयुक्त प्रदेशांत यांचे प्रमाण जास्त आहे.

२) आदिवासी जमातीचे ४० ते ८०% पर्यंतचे प्रमाण - यामध्ये अरुणाचल प्रदेश व दादरा नगरहवेली यांचा समावेश होतो.

३) आदिवासी जमातीचे २० ते ४०% प्रमाण - यामध्ये झारखंड, ओरिसा, छत्तीसगड, मध्यप्रदेश, सिक्कीम, मणीपूर व त्रिपूरा या राज्यांचा समावेश होतो.

आदिवासी जमातीचे १० ते २०% प्रमाण - यामध्ये आसाम, जम्मू काश्मीर व राजस्थान यांचा समावेश होतो.